प्रेसनोट                    दिनांक :- ०५/०७/२०२४.

मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये ठा.म.पा येथील अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचे पदाचा गैरवापर करून तक्रारदार यांचेविरूध्द खोटा गुन्हा दाखल केला म्हणून अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांनी गुन्हा दाखल केला.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग / घटक | :- | ठाणे |
| गुन्हा नोद क्रमांक | :- | ठाणे नगर पोलीस स्टेशन गु.र.नं. ६५३/२०२४, भारतीय दंड विधान संहितेच्या कलम १०९, १६६, १६७, २०१, २०२, २१७, २१८, ४६५, ४६६, ४६८, ४६९, ४७१, ४७३, ४७४, ४७६, ५११ सह ३४ व भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ च्या कलम १३ (१) (अ), १३ (१) (ड), १३ (२) प्रमाणे |
| आरोपीचे नांव व कार्यालय, राहण्याचा पत्ता | :- | १) श्री. मनिष दिनेशचंद्र जोशी, सचिव,<br>२) श्री. सुरेश शिवलाल राजपूत, प्रभाग अधिकारी, कळवा प्रभाग समिती,,<br>३) श्री. रविंद्र दत्तात्रय कासार, कनिष्ठ अभियंता,<br>४) श्री. बाळू हनुमंत पिचड ठा.म.पा ठाणे, मुख्य प्रशासकीय कार्यालय, .<br>५) श्री. गगनसिंग दानसिंग थापा तत्कालीन नेमणूक उथळसर प्रभाग समिती, **सर्व नेम. ठाणे महानगरपालिका ठाणे** |
| थोडक्यात हकीकत | :- | **अर्जदार यांचे तक्रारी संदर्भात एम.ए. नं. २५६/२०१३ सीआरपीसी १५६ (३) अन्वये मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये** ठाणे महानगर पालिकेतील वर नमूद अधिकारी व कर्मचारी आणि इतर आरोपी यांनी स्वत:च्या आर्थिक फायदाकरीता कायदयामधील तरतूदींची जाणीवपुर्वक व हेतुपुरस्सर अवज्ञा करून खोटे, बनावट आणि चुकीचे दस्ताऐवज तयार केले. तसेच सदरचे दस्ताऐवज खोटे, बनावट आणि चुकीचे असल्याचे माहित असून देखील खरे म्हणून वापरून चुकीच्या अभिलेखाची मांडणी केली व शासकीय अभिलेखात खोटया नोंदी केल्या. तसेच, सदरचे खोटे, बनावट आणि चुकीचे दस्तऐवज समान उद्‌देश साध्य करण्याकरीता संगनमताने कट रचून न्यायालयीन अभिलेखात पुराव्याकामी दाखल करुन कायद्याने माहिती देणे बंधनकारक असताना सुध्दा जाणीवपूर्वक खोटी माहिती देवून तक्रारदार यांना नुकसान पोहचवण्याच्या दृष्टीने आणि तक्रारदारांना खोटया गुन्हयात अडकविण्याच्या गैर उद्‌देशाने त्यांना कोणत्याही प्रकाराचे अधिकार नसतांना स्वत:च्या आर्थिक फायदाकरीता, पदाचा दुरुपयोग करून तक्रारदार यांचेविरूध्द खोटे पुरावे तयार केले व खोटी फिर्याद दाखल करून आरोपी यांनी गुन्हेगारी गैरवर्तन केले.<br>म्हणून वरील नमूद आरोपीत अ.क्र. १ ते ५ यांचेविरूध्द भादवि संहिता कलम १०९, १६६, १६७, २०१, २०२, २१७, २१८, ४६५, ४६६, ४६९, ४७१, ४७३, ४७४, ४७६, ५११ सह ३४ व भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ च्या कलम १३ (१) (अ), १३ (१) (ड), १३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी- मा. श्री. सुनिल लोखंडे सो, पोलीस अधीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**मा. श्री. गजानन राठोड, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**मा. श्री. महेश तरडे, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्याऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---


सपंर्क पत्ता — ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ — acbmaharastra@mahapolice.gov.in
ई–मेल — spacbthane@ mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार — acbmaharastra.net
व्हॉटस् ॲप क्र. — 9930997700


( विजय कावळे )
पोलीस निरीक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.

Scanned with OKEN Scanner